महाराष्ट्र शासन
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ**
**परभणी-(महाराष्ट्र)**
प्रशासकीय ईमारत, वसमत रोड,परभणी-431402
**कुलसचिव कार्यालय**
ईमेल :reg_mau@rediffmail.com दुरध्वनी (02452) 229755 संकेतस्थळ:www.vnmkv.ac.in फॅक्स: (02452) 229755,223582


जा.क्र.ई-निविदा/परिपत्रक/२०२५/साप्रवि-६/2019
दिनांक १०/०६/२०२५

## परिपत्रक

वनामकृवि परभणी अंतर्गत मुख्यालयातील सर्व कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, मा.सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांचेशी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार, वनामकृवि परभणी अंतर्गत मुख्यालयामध्ये असणा-या कार्यालयीन व प्रक्षेत्रावरील कामाकरीता ई निविदे द्वावारे केवळ प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांकडूनच मनुष्यबळ पुरवठा उपलब्ध करून घेण्यात येतो. परंतू प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे परवाने हे सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांचे कडे नोंदणी / नुतणीकरण करणे आवश्यक असते. सद्यस्थितीत संबंधीत कंत्राटदारांनी प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे परवाने नोंदणी / नुतणीकरण न केल्याचे निदर्शनास आलेले असून सदरील बाब ही गंभीर स्वरूपाची आहे.

तद्नुषंगाने वनामकृवि परभणी मुख्यालया अंतर्गत असणा-या कार्यालयीन व प्रक्षेत्रावरील कामाकरीता ई निविदे द्वावारे प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांकडून मनुष्यबळ पुरवठा उपलब्ध करून घेण्यात येतो अशा सर्व प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांनी त्यांचे परवाने सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांचे कडे तात्काळ नोंदणी / नुतणीकरण करून घेणेत यावेत अन्यथा सदर कंत्राटदारांचे कामाचे आदेश रद्द करण्यात येतील असे सुचित करावे. तसेच सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी परवाने नुतणीकरण / नोंदणी केल्याबाबतची शहानिशा करूनच संबंधीत कंत्राटदारांची देयके नियंत्रक, कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत.

**मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.**

**डॉ. र.भ. देशमुख**
**उपकुलसचिव**

**प्रतिलीपीः**

मा.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख, वनामकृवि, परभणी यांचे निर्देशनास आणून द्यावे.

**प्रतः**

१. नियंत्रक वनामकृवि, परभणी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
२. विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी.
३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांनी सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.
४. मा.कुलगुरु महोदय, यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव.